महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनीः+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्सः+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

परिपत्रक

जा.क्र.संवैशिवसं/आस्थापना-४(तांत्रिक)/ता.ज्ये.सू./सहाय्यक दंत तंत्रज्ञ/ १०२ /२०२३, दि. ११ /०१/२०२३

प्रति,
सर्व अधिष्ठाता/अधिक्षक/अधिक्षिका/
सहयोगी प्राध्यापक/प्राचार्य,
सर्व शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालये,
संलग्नीत रुग्णालये व आरोग्य पथके,
महाराष्ट्र राज्य.

**विषय:- संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमधील गट-क (तांत्रिक) संवर्गातील "सहाय्यक दंत तंत्रज्ञ" या पदावर दिनांक ०१.०१.२०२३ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची राज्यनिहाय सेवा ज्येष्ठता सूची...**

सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त असलेली शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये, आरोग्य पथकांच्या आस्थापनेवरील गट क (तांत्रिक) संवर्गातील **"सहाय्यक दंत तंत्रज्ञ"** या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची राज्यनिहाय तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द झाल्याची बाब तात्काळ आपल्या आस्थापनेवरील संबंधित संवर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यांत यावी. सदरील यादी मध्ये काही दोष/चुका/त्रुटी असल्यास त्याबाबतची अभिवेदने कर्मचाऱ्यांकडून मागवून ती प्राधान्याने संचालनालयास यादी प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांत सादर करण्यात यावीत. प्रसिध्द करण्यांत आलेल्या सूचीबाबत काही शंका असल्यास संचालनालयाच्या **आस्थापना-४** fbranchdmer@gmail.com या e-mail वर सादर करावी.

याबाबत आपणांस असेही कळविण्यांत येते की, कर्मचाऱ्यांकडून अभिवेदने प्राप्त झाल्यानंतर सदरील अभिवेदनांसोबत प्राप्त सहपत्रांची शहानिशा आपल्या स्तरावर प्रथमत: करावी व त्यामध्ये तथ्य आढळल्यास सदरील अभिवेदने आपल्या अभिप्रायांसह या संचालनालयास सादर करावीत. तसेच ज्येष्ठता सूचीमधील तक्त्यामध्ये बदल असल्यास तसाच तक्ता तयार करुन स्वतंत्रपणे सादर करावा. याशिवाय कर्मचाऱ्यांची सर्व अभिवेदने एकत्र पाठवावित एक-एक अभिवेदन स्वतंत्रपणे पाठवू नयेत.

एखाद्या कर्मचाऱ्याचे नांव नसल्यास यादीमधील सर्व मुद्यांची माहिती सादर करावी तसेच कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव नमुद करावे, फक्त आद्याक्षरे (Initial) नमुद करु नयेत.

सदर यादी प्रसिध्द करीत असतांना कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही यादी दक्षता घ्यावी सेवा ज्येष्ठता यादी संबंधीतास वितरीत केल्याची पोच पावती घेण्यात येवून ती कार्यालयात जतन करुन ठेवण्यात यावी.

11.01.23

**संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.**

| गट-क (तांत्रिक) संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२३ रोजीची तात्पुरती जेष्ठता सूची | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक दंत तंत्रज्ञ | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यरत संस्था | जातीचा प्रवर्ग | नियुक्ती चा प्रवर्ग | नियुक्ती दिनांक | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | नियुक्ती माध्यम | जात प्रमाणपत्र आहे अथवा नाही | शैक्षणिक अर्हता | शेरा |
| १ | २ | ४ | ५ | ५ | ६ | ८ | ९ | १० | ११ | १३ | १५ |
| १ | श्रीमती हेंमांगी रविंद्र मिरखेलकर | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | खुला | खुला | ०७-०१-१९८७ | १४/०३/१९६६ | ३१/०३/२०२४ | सरळसेवा | आहे | एचएससी, डिएचसी | |
| २ | श्री.संजय फेदुजवार | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | इमाव | इमाव | २८-०६-२००६ | ३०-१२-१९६८ | ३१-१२-२०२६ | सरळसेवा | आहे | एचएससी, डिएचसी | |
| ३ | श्री महिंद्रा पुरुषोत्तम अमृतकर | शा.द.म.व.रु मुंबई | खुला | खुला | ३१-०७-२००९ | १९-१२-१९८६ | २९-०२-२०४४ | सरळसेवा | नाही | एचएससी, डिएचसी | |
| ४ | दर्शना शंकराराव ब्रोद्रे | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | अनुसुचित जाती | अनुसुचित जाती | ०४-०६-२०१३ | १२-१०-१९८४ | ३१-१०-२०४२ | सरळसेवा | आहे | एचएससी, डिएचसी | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | कांचन युवराज खाडे ( बदलेले नाव कांचन प्रदिप भोईर) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | अनुसुचित जमाती | अनुसुचित जमाती | १९-११-२०१३ | २३-१०-१९९१ | ३१-१०-२०४९ | सरळसेवा | आहे | एचएससी, डिएचसी | |
| ६ | संदीप प्रभाकर आढाव | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | इमाव | इमाव | १३-११-२०१३ | ३०-१०-१९८७ | ३१-१०-२०४५ | सरळसेवा | आहे | एचएससी, डिएचसी | |
| ७ | श्री. प्रसाद ज्ञानेश्वर वाघ | शा.द.म.व.रु मुंबई | खुला (मराठा) | खुला | १८/०९/२०१४ | ०८-०४-१९९० | ३१/०८/२०४८ | सरळसेवा | नाही | एचएससी, डिएचसी | |

11.01.23

संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई

10/01/2023

10/1/23

10/1/23

(२५)

संचालनालय वैद्यकिय शिक्षण व संशोधन,
शाखा फ क्रमांक ९००७
दिनांक ३१३१२०२३
प्रशासकिय अधिकारी
सहा. संचालक
संचालक
आयुक्त

श्रीकांत भीमराव बोराडे
दंत आरोग्य तज्ञ
दंत परीवेष्टनशास्त्र विभाग,
शा.दं.म. व. रू., औरंगाबाद.
दि. ०६/०२/२०२३
6|2|23

प्रति,
**मा. आयुक्त**
वैद्यकिय शिक्षण व संशोधन विभाग,
मुंबई.

योग्य मार्गाने (मार्फत)-----

**मा. अधिष्ठाता**
शासकिय दंत महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबाद.

व

**मा. विभाग प्रमुख,** दंत परीवेष्टनशास्त्र विभाग यांचे मार्फत

**विषय :** **दंत आरोग्य तज्ञ या पदधारकांची दि. ०१/०१/२३ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संचालनालयाद्वारे प्रसिद्ध राज्यनिहाय सेवा जेष्ठतासुची मधील दोष/ चुका/ त्रुटी/ शंका सविनय निदर्शनास आणून देवून निर्दोष यादि सुधारित करून मिळणे बाबत विनंती.**

**संदर्भ : १. संचालनालयाचे परीपत्रक जा.क्र.सं.वै.शि.व. सं/आस्थापना-४ (तांत्रिक)/ता.ज्ये. सु. / दं.आ.तज्ञ/ २५०/२०२३ दि.२५/०१/२०२३**
**२. संस्था प्रशासनाचे परीपत्रक जा.क्र. शा.दं.म. व रू औं.बाद/ आस्था-३ /दंत आरोग्य तज्ञ / ज्ये. यादि / ९०७/२०२३ दि. ३/०२/२०२३**

**मा. महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर करीत आहे की, संदर्भ २ अन्वये दंत आरोग्य तज्ञ संवर्गाची दि. १/१/२०२३ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता सुची अत्यंत तत्परतेने मला अग्रेषित करण्यात आली, या बद्दल मा. अधिष्ठाता मा. विभाग प्रमुख, मा. प्रशासकिय अधिकारी, का. अ. आणि आस्थापना -३ या सर्वांचे मनःपुर्वक धन्यवाद आणि मनःपुर्वक आभार, सविनय सादर.

F-1
683
31/3

आपल्या निर्देशा प्रमाणे उक्त जेष्ठता सुचीची पाहणी केलेली आहे व यादित अनेक दोष/ चुका/ त्रुटी/ आणि शंका आढळून येत असल्यामुळे त्या खालील प्रमाणे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.-------

१. सेवा जेष्ठता यादि दि. १/१/२०२३ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ग्रहित धरून तयार करण्यात आली आहे, परंतु यादित १/१/२०२३ रोजी कार्यरत नसणारे (सेवा निवृत्त) कर्मचारी समाविष्ट करण्यात आलेले आहेत, ही बाब अनाकलनीय असून संचालनालयाच्या सामान्य व्यवहार ज्ञानावर, व्यावहारिक बुद्धीवर प्रश्नाचिन्ह निर्माण करणारी आहे. कृपया मा. संचालनालयाने सद्सद्विवेकबुद्धीनुसार विचार करावा, परीपत्रकाचा विषय गांभिर्याने लक्षात घ्यावा व यादि दि. १/१/२०२३ रोजी 'दंत आरोग्य तज्ञ' पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची असल्यामुळे, यादित सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा आणि १/१/२०२३ रोजी शासन सेवेत कार्यरत नसणाऱ्या कर्मचाऱ्यांचा उल्लेख का करण्यात आला व १ ते ५ (पाच) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समावेशासह सदोष यादि संकेतस्थळावर प्रदर्शित करून संचालनालयाने कार्यानुनयनात सद्सद्विवेकबुद्धी आणि सामान्य व्यावहारिक बुद्धीचा अभाव असल्याचे प्रदर्शन संकेत स्थळावर का केले. याबाबत मार्गदर्शन व्हावे, ही सविनय अपेक्षा.

यादितील अ.क्र. १ ते ५ (पाच) कर्मचारी हे सेवानिवृत्त आहेत, १/१/२०२३ रोजी कार्यरत नसल्यामुळे उक्त १ ते ५ कर्मचाऱ्यांचा उल्लेख यादितून वगळावा. यादित १ ते ३६ कर्मचारी असून १ ते ५ वगळल्यानंतर अ.क्र. ६ (सहा) वरील कर्मचाऱ्यास १ (एक) क्रमांक द्यावा. ३६-५= ३१ याप्रमाणे अ.क्र. ६ वरील कर्मचाऱ्यास १ (एक) क्रमांक देवून अ.क्र. १ ते ३१, अशा ३१ (एकतीस) कर्मचाऱ्यांचीच यादि सुधारित करून त्रुटी दूर करावी. सुधारित यादि अ.क्र. ६ ते ३६ प्रमाणे सुधारीत करून अ.क्र. ६ ला क्र. १ देवून (१-३१) अशी सुधारीत करावी ही विनंती. अ.क्र. ६ वर **श्रीकृष्ण तुकाराम कुमावत** हे कर्मचारी आहेत. व उपरोल्लेखित १ ते ५ सेवानिवृत्त कर्मचारी वगळल्यानंतर अ. क्र. ६ वरील **श्रीकृष्ण तुकाराम कुमावत** यांचा यादितील अ.क्र. १ (एक) असा करावा, त्यासह

अ.क्र. ३६ वरील शेवटच्या कर्मचारी **श्रीमती गौरी मोहन ओक** यांना यादित अ.क्र ३१ (एकतीस) देवून यादि १ ते ३१ अशी अद्ययावत आणि दोष विरहीत करावी, सत्वर कार्यवाहि व्हावी ही सविनय अपेक्षा.

२. एकच पद परंतु मराठी पदनामे २/२ (दोन-दोन). एकाच पदाला दोन-दोन मराठी आणि वेगवेगळी नावे देवून मा. संचालनालयाने अनोख्या विद्वत्तेचा परीचय देवून एक प्रकारे आदर्श प्रशासनाचा वस्तूपाठच संकेतस्थळावर प्रदर्शित केला आहे, यास्तव वैद्यकिय शिक्षण विभागात एकाच पदाला वेगवेगळी मराठी नावे तसेच दोन-दोन नावे देण्याची बाब कोणत्या आधारे न्याय्य ठरते, तसेच वै.शि. विभागाने सर्वच वर्ग - १ ते ४ मधील सर्वच्या सर्व पदांना मराठीत एकाच नावा ऐवजी दोन-दोन अथवा अनेक नावांनी संबोधण्याची प्रथा अवलंबिली आहे का, या बाबत समुपदेशनपर मार्गदर्शन व्हावे हि विनंती. वै.शि. विभागास 'एक पद एक मराठी पदनाम' हि शासन संकल्पना अनिवार्य असताना ही डेंटल हायजिनिस्ट संवर्गासाठी मराठीत दंत आरोग्य तज्ञ/दंत आरोग्यक ही दोन व वेगवेगळी नावे कोणत्या आधारे अस्तित्वात आहेत याचेही मार्गदर्शन व्हावे. तसेच 'दंत आरोग्य तज्ञ' हे पदनाम अधिकृत, योग्य, शासनाने निर्धारित केलेले आहे, याची सत्वर आणि सविनय नोंद घ्यावी ही कळकळीची विनंती. राज्यस्तरावर 'दंत आरोग्य तज्ञ' हेच नाव अधिकृत असून 'दंत आरोग्य तज्ञ' हे एकच पदनाम राज्यभरात वापरावे, 'दंत आरोग्यक' हे पदनाम चुकीचे, आणि अपभ्रंषित असून दंत आरोग्यक ह्या भ्रष्ठ पदनामाचा जावई शोध कोणी लावला, कधी लावला याबाबतही मार्गदर्शन करून दंत आरोग्यक ह्या भ्रष्ठ मराठी पदनामाच्या शासन निर्णयाची प्रत मला व संवर्गास अग्रेषित करून मराठी पदनामाचा संभ्रम दूर करावा , उक्त भ्रष्ठ पदनामाचा शासन निर्णय अग्रेषित न केल्यास राज्य स्तरावर दंत आरोग्य तज्ञ हे एकच पदनाम वापरण्याचे निर्देश देवून संवर्गाची मानसिक कुचंबणा टाळावी ही सविनय अपेक्षा

३. 'दंत आरोग्य तज्ञ' हेच पदनाम सुयोग्य आणि शासन निर्धारीत असून 'दंत आरोग्य तज्ञ' हेच एकमेव अधिकृत पदनाम आहे. याची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आपल्या निदर्शनास सविनय आणून देत आहे. ---

१ मे १९६० साली महाराष्ट्र राज्य आस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या साक्षांकनाने महाराष्ट्र शासनाचा अधिकृत पदनाम दोष १९६२ साली निर्गमीत झाला व २०२३ साली आजही अस्तित्वात असून दैनंदिन कामकाजात भिनलेला आहे.

पदनाम कोष पान क्र. १९, १२७ अवलोकावे मराठी - इंग्रंजी-इंग्रजी-मराठी स्वरूपात दंत आरोग्य तज्ञ हे पदनाम महाराष्ट्र शासनाने १९६२ पासून अधिकृत केल्याची बाब यावरून सप्रमाण सिद्ध होते.

यास्तव 'दंत आरोग्यक' या पदनामाचा वापर हा शासनाचा अनादर / अपमान ठरतो की नाही याबाबत मार्गदर्शन करावे.

१९६२ पासून गेल्या ६१ वर्षापासून दंत आरोग्य तज्ञ पदनाम आस्तित्वात असतानाही संचालनालय महाराष्ट्र शासनाचाच पदनाम कोष का नाकरात आहे, भ्रष्ट, चुकीचे व निराधार दंत आरोग्यक हे पदनाम का वापरत आहे, याबाबत मार्गदर्शन करावे ही विनंती यास्तव महाराष्ट्र शासनाचा व पदनामकोषाचा रास्त आदर राखून संचालनालयाने केवळ आणि केवळ 'दंत आरोग्य तज्ञ' हेच एकमेव व अधिकृत पदनाम वापरावे, ही सविनय अपेक्षा.

४. २०२१/२२ ची दंत आरोग्य तज्ञ पदाची सेवा जेष्ठता यादि ही परिपत्रकासह संकेतस्थळावर उपलब्ध आहे त्या यादित तर ३/३ (तीन/तीन) नावे उक्त संवर्गास प्रदान करण्यात आली आहेत. याबाबी संचालनालयाची 'दंत आरोग्य तज्ञ' संवर्गाप्रती असलेली उदासिनता आणि नकारात्मकता सिद्ध करण्यास पुरेशा आहेत कृपया २१/२२ च्या सेवाजेष्ठता यादिसह परीपत्रकाचे अवलोकन करावे, हि विनंती.

५. १/१/२०२३ नुसार निर्गमीत सेवा जेष्ठता यादितील अ.क्र. ८ व अ.क्र. ९ कडे सविनय लक्ष वेधित आहे, अ.क्र. ८ वरील कर्मचाऱ्याचा नेमणुक दि. १५/१२/१९९४ असून

अ.क्र. ९ वरील कर्मचाऱ्याचा नेमणुक दि. २५/११/१९९४ आहे. २५ नोव्हेंबर १९९४ हा दिवस आधी येतो व १५ डिसेंबर ११९४ हा दिवस नंतर येतो. म्हणजेच अ.क्र. ९ वरील उमेदवार शासन सेवेत अ.क्र. ८ वरील उमेदवाराच्या आधी शास सेवेत रूजू झाला. यास्तव अ.क्र. ९ वरील उमेदवार अ.क्र. ८ वरील उमेदवारास सेवा जेष्ठ आहे. असे असतानाही अ.क्र. ९ वरील उमेदवारास अ.क्र. ८ च्या खाली दर्शवून अन्याय करण्यात आलेला आहे. यास्तव सेवाजेष्ठता यादित सुधारणा करून ९ वरून ८ वर आणि ८ वरून ९ वर अशी आदलाबदली सेवाजेष्ठता यादित करणे अनिवार्य आहे, त्यासह १ ते ५ सेवानिवृत्त कर्मचारी यादितून वगळून १ ते ३६ ऐवजी १ ते ३१ अशी सुधारीत यादि व ९ वरील कर्मचाऱ्यास ८ क्रमांकावर व ८ वरील कर्मचाऱ्यास ९ क्रमांकावर दर्शवून पाच (५) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वगळून सुधारित १ ते ३१ कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादि खालीलप्रमाणे सुधारित आणि अद्ययावत करून दोषविरहीत यादि खालीलप्रमाणे करण्यात यावी.

| **अ.क्र.** | **कर्मचाऱ्यांचे नाव** | **यादितील सुधारीत क्रमांक (दोष विरहीत)** | **यादितील जुना क्रमांक (सदोष)** |
|---|---|---|---|
| १ | श्रीकृष्ण तुकाराम कुमावत | १ | ६ |
| २ | सौ.सुनीता रमेश कनाके (गेडाम) | २ | ७ |
| ३ | श्रीकांत भीमराव बोराडे | ३ | ९ |
| ४ | सौ. सुजाता मांजरेकर | ४ | ८ |
| ५ | | | |
| ६ | | | |
| | | | |
| ३१ | श्रीमती गौरी मोहन ओक | ३१ | ३६ |

सदोष यादितील अ.क्र. ९ वरील कर्मचाऱ्याचे नाव श्री . **श्रीकांत भीमराव बोराडे** असून अ. क्र. ८ वरील कर्मचाऱ्याचे नाव **श्रीमती सुजाता मांजरेकर** आहे. त्यांच्यात ९ वरून ८ व ८ वरून ९ वर अशी अदलाबदल करून दोष विरहीत सुधारीत यादित, **श्रीकांत भीमराव बोराडे** हे **श्रीमती सुजाता मांजरेकर** यांच्यापेक्षा सेवाजेष्ठ असल्यामुळे **श्रीकांत भीमराव बोराडे** अ. क्र. **३** वर आणि **श्रीमती सुजाता मांजरेकर** यांना अ.क्र. **४** वर स्थानांकित करून दोष दुर करावा ही विनंती.

**श्रीकांत भीमराव बोऱ्हाडे** हा माझ्या आडनावाचा उल्लेख चुकीचा असून **बोराडे** याप्रमाणे आडनाव लिहावे हि विनंती, सत्वर कार्यवाहि व्हावी ही सविनय अपेक्षा.

६. जेष्ठता यादितील स्तंभ क्र.-११ कडे लक्ष वेधू ईच्छित आहे, जो शैक्षणिक अर्हतेचा रकाना आहे. ज्यात SSC/HSC/ Dental hygienist असे इंग्रजी भाषेत नमूद आहे. संपूर्ण परीपत्रक मराठीत परंतू शैक्षणिक अर्हता इंग्रजीत का नमूद करीत आहेत, ही बाब अनाकलनीय आहे, संचालनालयास SSC/HSC/ Dental hygienist या इंग्रजी शब्दांना मराठीत पर्यायी शब्द सापडत नाहीत का, अथवा दंत आरोग्य तज्ञ संवर्गाची आवश्यक शैक्षणिक अर्हता शुद्ध मराठी मध्ये नमूद करण्यास संचालनालय असमर्थ आहे का आणि महाराष्ट्र शासनाने दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर अनिवार्य करूनही संपूर्ण परीपत्रक मराठीत असतांना केवळ शैक्षणिक अर्हता इंग्रजी भाषेत नमूद असल्यामुळे मराठी भाषेचा ऊपमर्द होवून मराठीमध्ये कामकाज, व दर्जेदार प्रशासनास संचालनालयामर्फत छेद देवून प्रशासकिय दर्जावर गालबोट लागत नाही का, अशा शंका उपस्थित होण्यास वाव आहे की नाही याबाबत मार्गदर्शन व्हावे व त्या दुरही व्हाव्यात ही सविनय अपेक्षा.

दंत आरोग्य तज्ञ संवर्ग भारतीय दंत कायदा ११९४८ अन्वये महाराष्ट्रासह देशभरात अस्तित्वात असून दंत शास्त्राची नियामक संस्था भारतीय दंत परीषद, नवी दिल्ली या स्वायत्त संस्थेचे निकष, मानके दंत आरोग्यय तज्ञ संवर्गास लागू असून शासन सेवेत रूजू होनेसाठी राज्य दंत परीषदेत अधिकृत नोंदणी अनिवार्य असून, शैक्षणिक अर्हता पुर्ण केल्यानंतर नियामक दंत शास्त्र परीषदेत म्हणजेच महाराष्ट्र राज्य दंत परीषद, मुंबई येथे

अधिकृत नोंदणी असल्यासच सदर उमेदवार अधिकृत 'दंत आरोग्य तज्ञ' म्हणून गणला जावून शासन सेवेत 'दंत आरोग्य तज्ञ' पदावर नेमणुक मिळणेस पात्र ठरतो. भा. द.प. नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर दंत आरोग्य तज्ञ अभ्यासक्रमाची राजपत्र अधिसुचना दि. १९/८/२००८ चे अवलोकन व्हावे. जी इंग्रजी व हिंदी भाषेत आहे. त्यात खालीलप्रमाणे अभ्यासक्रमाच्या नावाचा बोध होतो.

अभ्यासक्रमाचे इंग्रजी नामाभिधान - The Dental hygienist Diploma course

अभ्यासक्रमाचे हिंदी नामाभिधान - दंत स्वास्थ्य - विज्ञानी पाठ्यक्रम.

यास्तव इंग्रजी - डेंटल हायजिनिस्ट अभ्यासक्रम, हिंदी दंत स्वास्थ्य विज्ञानी अभ्यासक्रम आणि महाराष्ट्रातील मराठी भाषेत दंत आरोग्य तज्ञ अभ्यासक्रम असे नामाभिधान ठरते.

यास्तव संचालनालयाच्या सुलभ संदर्भासाठी व दंत आरोग्य तंज्ञ संवर्गाची शैक्षणिक अर्हता शुद्ध मराठीत लिहिणे संचालनालयास शक्य होवून मराठी भाषेचा अपमान होणार नाही, यासाठी दंत आरोग्य तज्ञ संवर्गाची शैक्षणिक अर्हता, खालीलप्रमाणे नमूद असावी...

**"दहावी/ बारावी नंतर दंत आरोग्य तज्ञ प्रमाणपत्र/ पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण व राज्य दंत परीषदेत नोंदणी अनिवार्य "**

मा. संचालनालयाने कृपया नोंद घेवून, स्तंभ/रकाना अ.क्र. ११ मध्ये शुद्ध मराठी भाषेत दंत आरोग्य तज्ञ पदाची शैक्षणिक अर्हता वरीलप्रमाणे नोंद करून मराठी मधील परीपत्रकात इंग्रजीचा वापर टाळून मराठी भाषेचा अपमान टाळावा व प्रशासनिक दर्जा राखून वरीलप्रमाणे दंत आरोग्य तज्ञ पदाची शैक्षणिक अर्हता जेष्ठता यादित सुधारित करावी ही सविनय अपेक्षा.

७. बऱ्याच वैद्यकिय / दंत महाविद्यालयातील दि. १/१/२०२३ रोजी कार्यरत दंत आरोग्य तज्ञ कर्मचाऱ्यांचा समावेश यादित करण्याचे राहून गेल्याची बाब नाकारता येत नाही, धुळे, अंबेजोगाई, मिरज, सांगली, इ. वैद्यकिय महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी यादित समाविष्ठ नाहीत, यास्तव संचालनालयाने खातरजमा करून यादि सुधारित करावी ही विनंती.

८. माझा जन्म दिनांक ८/३/१९७३ याप्रमाणे सुधारित करावा ३/८/७३ असा चुकीचा उल्लेख झालेला आहे. सविनय सादर.

तरी वरील उल्लेखित १ ते ८ (एक ते आठ) मुद्यांचा साकल्याने विचार करून, दंत आरोग्य तज्ञ संवर्गाची दि. १/१/२०२३ रोजी कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादि सुधारित करावी व दंत आरोग्य तज्ञ पदधारकांना न्याय द्यावा हि विनंती.

**आपला विश्वासू**

S. B. Borade

**श्रीकांत भीमराव बोराडे**

**आगाऊ प्रति,**

**मा. सचिव वै. सेवा/ मा. आयुक्त वै. शि. व सं, मुंबई/ मा. अधिष्ठता, शा.दं. म. व रू., औरंगाबाद यांना उक्त बाब कालबद्ध आणि १५ दिवसांत उलटपाली सादर करनेचे बंधन असलेमुळे माहितीस्तव सविनय सादर.**